माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३६/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. रमेश विश्वनाथ सावंत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) ए विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, ए विभाग म्युनिसिपल कार्यालय,
१३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, ए विभाग म्युनिसिपल कार्यालय,
१३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -०१

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ३३३३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १३६४/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०६.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १५.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. २४.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडून दि. १६.०३.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी त्यांचे दि. ०६.१०.२०२५ रोजीचे पत्राव्दारे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. परंतु, विनंती उशीरा प्राप्त झाल्याचे तसेच प्रकरण प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असल्याने विनंती अमान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुषंगाने व्दितीय अपील आदेशानंतर दि. १३.०३.२०२० रोजी तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतची पोहोचही आयोगास सादर केली.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप, CIMM
8-10-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.१०.२०२५**

State Information Commission * Greater Mumbai *